Top

F/c

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६ / ४८७

ई-मेल—desk१८@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

---

**संकेतस्थळ /रजिस्टर एडी/ई-मेल द्वारे**

क्र.१८/तंशिसं/टॉप क्लास/२०२२-२३/ २०८
दिनांक : ०५/ ०८ / २०२२

प्रति,

पत्रातील संस्थांच्या यादीतील संस्थांचे प्राचार्य / संचालक /अधिष्ठाता,
महाराष्ट्र राज्य.

विषय :- **सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यांची दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी टॉप क्लास एज्युकेशन शिष्यवृत्ती योजनांची सन २०२२-२३ साठीच्या अंमलबजावणीबाबत....**

संदर्भ : सामाजिक न्याय आणि सबलीकरण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडून प्राप्त पत्र क्र. D-१२०११/०३/२०२२-DBT दि.१५/०७/२०२२.

उपरोक्त विषयांकीत संदर्भीय पत्रान्वये मान्यताप्राप्त व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्था यादीतील सर्व संबंधित संस्थांचे प्राचार्य / संचालक / अधिष्ठाता यांना कळविण्यात येते की, सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची **दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी टॉप क्लास एज्युकेशन शिष्यवृत्ती** योजनेच्या महाराष्ट्र राज्यामधील अंमलबजावणीकरिता तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांना नोडल ऑफिस म्हणून घोषित करण्यात आले आहे. सदर योजनेची माहिती खालीलप्रमाणे,

## ❖ टॉप क्लास एज्युकेशन ( Top Class Education ) शिष्यवृत्ती योजना ::

सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली तर्फे दिव्यांगजन सशक्तिकरण विभाग यांनी दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षण ( पदवी व पदव्युत्तर ) घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता **दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी टॉप क्लास एज्युकेशन शिष्यवृत्ती योजना** ( Scholarship For Top Class Education for Students with Disabilities ) ही शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आलेली आहे. सदर योजनेकरीता कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित ) रुपये ६.०० लाखा पर्यंत व दिव्यांगाचे प्रमाण ४० % किंवा त्यापेक्षा अधिक असावे असे निश्चित करण्यात आलेले आहे.

या योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यासाठी केंद्र शासनाकडून खालीलप्रमाणे शिष्यवृत्तीचा संच निर्धारीत करण्यात आला आहे.

- शिष्यवृत्तीचा नविन ( Fresh ) संच/कोटा ( Quota ) -

| अ.क्र. | राज्य | संच संख्या |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र | ३१ |

- **शिष्यवृत्ती रक्कम :-**

सदर योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून नविन व नूतनीकरणाच्या शिष्यवृत्तीसाठी आलेल्या पात्र व मंजूर विद्यार्थ्यांला शिष्यवृत्तीची रक्कम खालील प्रमाणे निर्धारित करण्यात आलेली आहे.

| **अ.क्र.** | **शिष्यवृत्तीचे घटक** | **रक्कम** |
|---|---|---|
| अ | संस्थेला देय असणारे/देण्यात येणारे शैक्षणिक शुल्क व ना-परतावा शुल्काची प्रतिपूर्ती | प्रत्यक्ष वार्षिक शुल्क किंवा रुपये २,००,००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम शिष्यवृत्ती म्हणून देण्यात येते. |
| ब | देखभाल /परिरक्षण भत्ता | रु. ३,०००/- प्रति महिना वसतिगृहामध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांना<br>रु. १,५००/- प्रति महिना डे-स्कॉलर विद्यार्थ्यांना |
| क | विशेष भत्ते ( दिव्यांगाच्या प्रकारानुसार त्या अनुषंगिक उदा.वाचन भत्ता, संरक्षण भत्ता, मदत भत्ता इ.) | रु. २,०००/- प्रति महिना |
| ड | पुस्तके व स्टेशनरी | रु. ५,०००/- प्रति वर्ष |
| इ | संगणक व त्याच्या संबंधित सुटे भाग खरेदीच्या खर्चाची प्रतिपूर्ती | एका व्यक्तीला पूर्ण अभ्यासक्रमांत एकदाच रु. ३०,०००/- देय. |
| ई | निवड झालेल्या उमेदवारांच्या विशिष्ट दिव्यांगासाठी आवश्यक असलेल्या सॉफ्टवेअरसह मदत व मदतीच्या साहित्याची खरेदीच्या खर्चाची प्रतिपूर्ती | एका व्यक्तीला पूर्ण अभ्यासक्रमांत एकदाच रु. ३०,०००/- देय. |

उपरोक्त योजनेची सविस्तर माहिती केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालयाच्या संकेतस्थळावर ( संकेतस्थळ - www.disabilityaffairs.gov.in ) / केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( NSP ) पोर्टल (संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) वर देण्यात आलेली आहे.

सदर योजनेची मंजुर रक्कम केंद्र शासनाकडून थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये Direct Benefit Transfer ( DBT ) अंतर्गत जमा करण्यात येईल.

सदर योजना केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( NSP ) पोर्टलद्वारे ( संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) ऑनलाईनरित्या राबविण्यात येतात. **सन २०२२-२३ करिता** सदर योजनेच्या लाभासाठी, प्रवेशित विद्यार्थ्यांनी **नवीन** ( Fresh ) अर्ज व **सन २०२१-२२ मध्ये शिष्यवृत्ती मंजूर झालेल्या पात्र** विद्यार्थ्यांनी **नूतनीकरण** ( Renewal ) अर्ज NSP पोर्टलवर खालीलप्रमाणे जाहीर करण्यात आलेल्या अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईनरित्या करावे ( अर्ज करण्यापूर्वी मार्गदर्शनासाठी विद्यार्थ्यांनी NSP पोर्टलवर सदर योजनेसाठी उपलब्ध User Manual / Guideline चा वापर करावा.)

तसेच, संस्थांनी NSP पोर्टलच्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन प्राप्त झालेले अर्ज प्रलंबित न ठेवता पोर्टलवर नमूद अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईनरित्या तपासणी ( मंजूर / नामंजूर ) करावी.

| विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याचे व संस्थेने अर्ज तपासणीचे वेळापत्रक :: शै. वर्ष २०२२-२३ | | |
|---|---|---|
| अ.क्र. | कार्यवाही | अंतिम दिनांक |
| १ | विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरणे. | ३१ ऑक्टोबर, २०२२ |
| २ | संस्थांनी ऑनलाईन अर्जांची तपासणी ( मंजूर / नामंजूर ) करणे. | १५ नोव्हेंबर, २०२२ |
| टीप :: केंद्र शासनाकडून वेळापत्रकात काही बदल झाल्यास सदर बदल एनएसपी पोर्टलवर ( संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) जाहिर करण्यात येईल याची नोंद घ्यावी. | | |

महत्त्वाची सूचना-

१. संस्थांनी एनएसपी पोर्टलवरील संबंधित योजनांसाठी असलेल्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन Institute Profile अद्ययावत करावी.
२. संस्थांनी उपरोक्त योजनेबाबतची माहिती संस्थेच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर लावावी व योजनेसाठी पात्र असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांना योजनांबाबतची माहिती निदर्शनास आणून द्यावी व पात्र विद्यार्थ्याला अर्ज भरण्यासाठी आवश्यक सहकार्य करावे जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहाणार नाही.
३. विद्यार्थी केंद्र शासनाच्या ( NSP Portal ) व महाराष्ट्र शासनाच्या ( DBT Portal ) पोर्टलवरील शिष्यवृत्ती योजनांपैकी कोणत्याही एकाच योजनेचा लाभार्थी असेल याबाबत संस्था प्रमुखांनी स्वत: योग्य ती दक्षता घ्यावी.
४. संस्थेच्या लॉगीनमध्ये प्राप्त झालेले अर्ज जर तपासणीच्या अंतिम मुदतीनंतर संस्था स्तरावर तपासणीसाठी प्रलंबित राहील्यास **किंवा**
५. विद्यार्थ्याने एकाच वर्षाकरिता दोन - दोन शिष्यवृत्ती योजनांचा ( केंद्र व राज्य शासनाच्या अशा दोन्ही शिष्यवृत्ती योजनांचा ) लाभ प्राप्त करुन घेतल्यास **किंवा**
६. संस्थेमध्ये शिकत नसलेल्या विद्यार्थ्याच्या शिष्यवृत्ती अर्जास संस्थेकडून मंजूरी दिल्यास **किंवा**
७. संस्थेमध्ये TFWS अंतर्गत प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्याच्या शिष्यवृत्ती अर्जास संस्थेकडून मंजूरी दिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्था प्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.

( डॉ. अभय वाघ. )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई.

पृष्ठांकन क्र. विकाऔ/शिक्षण/२०२२/ 3007
दिनांक:- 11 AUG 2022

या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांना कळविण्यात येते की, सन २०२२-२३ साठी सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी टॉप क्लास एज्युकेशन शिष्यवृत्ती योजनांची उपरोक्त पत्रात नमूद माहिती व वेळापत्रकानूसार कार्यवाही पूर्ण करण्याची सूचना आपल्या संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाही अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(उमेश नागदेवे)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- १. मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा., मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर
२. या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.